# प्रकरण पाचवे

## निष्कर्ष आणि समारोप

अनिलांच्या खंडकाव्याचा अभ्यास करताना कवी अनिलांचे व्यक्तिमत्व त्यांच्या काव्यात प्रगट झालेले दिसते. अनिल गेली चाळीस वर्षे कविता लिहित आहेत. अनिलांनी कवितेच्या बहिरंगाप्रमाणे अंतरंगातही प्रयोग केले. पहिल्या बहरातील त्यांच्या प्रेमकवितेने त्यावेळच्या रसिकाला ओढून घेतले ते त्यांच्या वेगळेपणामुळे. आधुनिक काव्यातले प्रेम ही एक हृदयाची तळमळ आहे हे त्यांनी त्यांच्या आत्मानुभूतीतून व्यक्त केली आहे. "फुलवात" या पहिल्याच प्रेमगीत संग्रहाने अनिलांनी प्रथमश्रेणीच्या कवीत स्थान मिळविले.

अनिलांची चिरतरूण आणि चिररूचिर कविता अभ्यासाचा विषय झाली. अनिलांच्या प्रतिभेचा चाळीस वर्षाहून अधिक काळाचा प्रवास वैयक्तिक सुखदुःखाबरोबर जवळ जवळ अर्धशतकाचे सांस्कृतिक संचित बरोबर घेऊन केलेला हा प्रवास जेवढा दीर्घ तेवढाच इमानाने भरलेला आहे.

अनिलांचे प्रेमकाव्य आगळेवेगळे आहे. त्यात मीलनापूर्वीच्या आतुरतेचे, मैत्रीचे व नंतरच्या पूर्ततेचे सुरेल संगीत आहे. त्यांचे काव्य उत्तान न होता उत्कट झाले आहे. त्यांची कविताच वृत्तितःच वेगळी आहे. विविध कवींच्या वृत्तिविशेषांचे एकीकरण त्यांच्या कवितेत सहजपणे आढळते. तीत केशवसुतांचे चिंतनशीलत्व, बालकवीचे सौकुमार्य, तांबे यांचा तृप्तपणा, माधव ज्युलीयन यांचे प्रयोगशीलत्व, कुसुमाग्रजांची क्रांतीपूजा, बोरकरांचे रसप्रसन्नत्व आणि मर्ढेकरांची संस्कृतिटीका एकवटली आहे.

अनिलांच्या सुजाण, सुसंस्कृत रसिक व्यक्तित्वाला कवीपदवी मिळवून दिली ती त्यांच्यातील सौंदर्याच्या सूक्ष्म जाणिवेने या सूक्ष्म नितळ छटांची प्रतीती निसर्गकवितेत दिसून येते. गगनी उगवलेला सायंतारा, परसातल्या फुलांचा मनोमनी दाटलेला सुवास, दूर निळया शेवटात होणारे व्योम्-धरचे मीलन, क्षितीजाच्या काळोखात उरलेली एकच एक प्रकाशरेषा

कोसळलेल्या सरीत भरलेली धुंवारी, मध्यरात्रीच्या निळयात खुललेले शांत चांदणे, सागाच्या फुलात चिंब झालेली खिन्न तातातूट ही आणि यासारखी आर्त, आर्द्र दृश्ये अनेक ठिकाणी विखुरलेली आहेत.

या कवीची व्यक्तित्वाची वीण दुहेरी आहे. घरकुलाइतकीच या मनाला सामाजिकतेची ओढ आहे. प्रसन्न व्यक्तित्वाच्या ह्या कवीच्या कवितेत शेवटपर्यंत जी उन्मनी अवस्था आहे ती एका निखळ आशावादी कवीची आहे. निव्वळ गुलजार गीते लिहिणाऱ्या कवीची नाही. कवीची प्रतिभा सहजतेने भावतरलतेबरोबरच वैचारिकतेचेही उज्ज्वल दर्शन घडविणारी आहे. एकाचवेळी वस्तुनिष्ठा आणि आत्मनिष्ठा ह्यांच्या परस्परानुप्रवेशातून घडलेले काव्य हा त्यांच्या प्रतिभेचा विशेष होय. ती भावनांच्या उत्कट आविष्काराबरोबरच वैचारिक गंभीर आशयाची धारणा दर्शविण्यासाठी खंडकाव्याचेही रूप धारण करते.

"फुलवात" नंतर तीन वर्षांनी त्यांनी "प्रेम आणि जीवन" ही मुक्तछंदातील दीर्घ कविता लिहिली आणि ती लगेच प्रसिध्दही झाली. त्यानंतर तीनच महिन्यांनी लिहिलेले "भग्नमूर्ति" हे मुक्तछंदातील खंडकाव्य मात्र पाच वर्षानंतर प्रसिध्द झाले.

"भग्नमूर्ति" ही दीर्घ कविता मुक्तछंदात लिहून आपले मन केवळ प्रेमविषयात रंगत नसून व्यापक सामाजिक सांस्कृतिक विषयाकडेही आपले लक्ष आहे हे अनिल यांनी दाखविले. आपली जुनी मूर्तिकला अभिमानास्पद असून आज आपण तिच्याकडे दुर्लक्ष करीत आहोत. आपल्या उज्ज्वल संस्कृतीचे स्मारक असे हे अवशेष आज भग्न होऊन जात आहेत. आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाचे स्मरण देऊन नवीन पराक्रमास प्रोत्साहन देणारा हा ठेवा आपण जतन केला पाहिजे.

"भग्नमूर्ति" या खंडकाव्यात संस्कृतीचा विनाश झाल्याबद्दलची हळहळ व्यक्त केली आहे ती त्यांच्या प्रेमाइतकीच व्यक्त झाली आहे. संस्कृतीचा विचार करण्याइतके मन सजग झाले आहे. आपल्या परंपरेचा अभिमान वाटावा व तीच परंपरा विनाशाप्रत नेणारे आपणच आहोत ही भावना त्यांनी व्यक्त केली आहे. या काव्याचा अभ्यास करताना कवीच्या वैचारिक पातळीपर्यंत आपण जाऊ शकतो. आपल्या संस्कृतीचे रक्षण करण्याचे

तंत्र आत्मसात करावयास हवे. काव्यातील भावना वैयक्तिक नसूनही उत्कट आहे व उदात्तही आहे. भावनेच्या या स्वरूपास साजेल अशा धीरगंभीर भाषेमध्ये आणि गद्यगंभीर अशा मुक्तछंदामध्ये हे खंडकाव्य लिहिले गेले आहे.

विश्वाच्या पातळीवर कवी आपणास घेऊन गेला. आपला हा भारत देश व त्यातील हा महाराष्ट्र आहे त्यात राहणारा कवी मातृभाषेत जागतिक राजकारणाचा युध्दसंदर्भात विचार करणारी भावना व्यक्त करतो. आमच्यासारख्या वाचकांना अंतर्मुख होऊन ठाम अशी अनुभूती एका भव्य मानवी जीवनपटाचा एक सूक्ष्म धागा आपल्या हाती आला आहे अशी भावना निर्माण होऊन मनात आशावादीत्व निर्माण झाले असे मला अभ्यास करताना या खंडकाव्याचे फलित वाटले.

नवे जग निर्माण करण्याचे कवीचे आश्वासनही यातून व्यक्त झालेले दिसते. काव्याचा अभ्यास करताना कल्पनांचा ठेवा कलाप्रेमी असणाऱ्या व्यक्तिच्या मनात निर्माण व्हावा असे वाटले. ज्ञानाची सोबत आपल्याला समृध्दी देते, जाणीव देते असे मला वाटते.

"भग्नमूर्ति" मधील उपदेशकाची भूमिका युध्दकाळांत लिहिलेल्या "निर्वासित चिनी मुलास" या काव्यात ही कायम आहे. नवीन जगाचे आधार म्हणजे बालके होत. युध्दामुळे त्यांची ती असहाय्यता आणि शोचनिय स्थिती पाहून युध्दे आणि त्यांचे स्वार्थी प्रवर्तक याविषयीची चीड निर्माण होते ती या दीर्घ मुक्तछंदात्मक कवितेत प्रकट केली आहे.

शिल्पाकृती आणि संस्कृती यांचा मानवी जीवनाशी असणारा संबंध एक "उदात्त" विषय म्हणून त्यांनी काव्यबध्द करण्यात यश मिळविले. जीवनानंद तुटताना आशेची "उषा" आणि नैराश्याची "निशा" यांना सामोरा जातो. जीवन हे जगण्यासाठी आहे. त्याचा त्याग करण्यात किंवा त्याला विन्मुख होण्यास जीवनाची सार्थकता नाही असा विचार आपल्याही मनावर परिणाम करतो.

न्यायाधिश, साहित्यिक, समाजशिक्षक अशा विविध भूमिका त्यांनी आयुष्यात केल्या पण प्रत्येक भूमिका तितक्याच तन्मयतेने, चोखपणे बजावूनही ते कुठल्याच भूमिकेत मनाने अलिप्त राहिले नाहीत.

एकूण हा प्रवास वर्षभराचा त्यांच्या "सांगाती" कवितेतील ओळी सोबतीस घेऊन मांडावासा वाटतो. खूप खूप उंची वाढविण्याच्या एकाकी प्रयत्नात वाटते की,

"तुझ्याहून नसलो तरी तुझ्या समान होऊ दे"

अशा कृतार्थ जाणीवेने ही लघु – प्रबंधिका पूर्ण करताना अनिलांविषयीच्या कृतज्ञ भावना मनात दाटून येतात.

* * * * *